पुढारी

# सामाजिक प्रश्न सोडवणुकीसाठी चळवळी मजबुतीकरणाची गरज


## प्रा. बेडकीहाळ; विद्यापीठात ऑनलाईन चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सामजिक चळवळी मजबूत केल्या तरच सामजिक प्रश्न सोडवणे सुलभ जाईल, असे प्रतिपादन प्रा. किशोर बेडकीहाळ (सातारा) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभाग व नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय चर्चासत्र व शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे २६ वे अधिवेशन झाले. 'महाराष्ट्रातील नवसामाजिक चळवळी' हा मुख्य विषय होता. अधिष्ठाता प्रा. डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या.

चर्चासत्रात के. के. कावळेकर व्याख्यानमालाचे आयोजन केले होते. प्राचार्य पी. डी. देवरे (नाशिक) यांनी सामाजिक चळवळ व राज्य आणि आताची परिस्थिती याविषयी विवेचन केले. प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी कोरोना संकटाच्या काळात वेगवेगळ्या सामाजिक चळवळींची दिशा याबाबत मार्गदर्शन केले. शोधनिबंध सत्रात भारतातील नवसामाजिक चळवळ, कोरोना संकट, नेहरूवादी नवसामाजिक चळवळी, सहकार चळवळ व शैक्षणिक चळवळी विषयांतर्गत ५२ सदस्यांनी संशोधन पेपरचे वाचन केले. चर्चासत्र यशस्वितेसाठी डॉ. शिवाजी पाटील, प्रा. नेहा वाडेकर, प्रा. डॉ. विजय देठे, डॉ. अनिल पाटील, डॉ. सागरकुमार जाधव यांनी परिश्रम घेतले.



प्रा. बेडकीहाळ

# ‘इन्फ्रारेड गन’ शोधणार गर्दीत विषाणू

## कोल्हापूरच्या ॲक्युरा टेकने बनवले यंत्र

**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT

**कोल्हापूर :** करोना विषाणूचा संसर्गाचे मूळ असलेल्या गर्दीच्या ठिकाणी लपलेला करोना विषाणू शोधणारे तंत्रज्ञान कोल्हापुरातील ॲक्युरा टेक कास्टिंग लिमिटेडच्या तंत्रज्ञांनी विकसित केले आहे. भविष्यात सार्वजनिक ठिकाणी हेल्थ अँड हायजीन प्रणालीतून सुरक्षितता राखण्यासाठी तयार केलेल्या या यंत्रणेमुळे करोनाचा सामूहिक संसर्ग रोखला जाणार आहे. इन्फ्राग्रेड गन आयस्मार्ट टेक्नॉलॉजीचा हा प्रस्ताव ॲक्युटा टेकतर्फे शिवाजी विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरला सादर करण्यात आला असून हा प्रस्ताव मंजूर झाल्यास देशात अशा प्रकारचा स्टार्टअप प्रस्ताव कार्यान्वित होणारे कोल्हापूर शहर पहिले शहर ठरणार आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून संपूर्ण जग करोना विषाणूशी लढा देत आहे. तर चार महिन्यांपासून भारतात या साथीने थैमान घातले आहे. करोना प्रतिबंधक लस निर्मितीसाठी जगातील वैद्यकीय संशोधक रात्रीचा दिवस करत आहेत. करोना विषाणूचा उगम चीनमधील वुहान या शहरातून झाल्याने भविष्यात चीनमधून आयात होणाऱ्या उत्पादनांना पर्याय उपलब्ध होत आहेत. करोनाचे संकट रोखण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. कोल्हापुरातील तंत्रज्ञान विषयक उत्पादन निर्मिती क्षेत्रातही याबाबत प्रयत्न सुरू होते. शिरोली एमआयडीसीमध्ये ॲक्युरा टेक कास्टिंग लिमिटेडनेही मार्चच्या २६ तारखेला करोना संसर्गाचे गांभीर्य निर्देशित करणारी यंत्रणा विकसित करण्याचे काम हाती घेतले. सध्या हा प्रस्ताव शिवाजी विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरकडे आहे. अमर जाधव व कृष्णा जाधव यांनी हे तंत्रज्ञान विकसित केले आहे.

**जागतिक विज्ञान, तंत्रज्ञान दिन विशेष**

### काय आहे हे तंत्रज्ञान

हेल्थ आणि हायजीन या पायावर ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे. करोनाचे संकट निवळले तरी भविष्यात सार्वजनिक जीवनात वावरताना सुरक्षित वावर, सुरक्षा या गोष्टी महत्त्वाच्या ठरणार आहेत. यादृष्टीने सार्वजनिक तसेच व्यक्तिगत सुरक्षेसाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे. यामध्ये थर्मल स्कॅनर यंत्रणा कार्यान्वित केली असून यामुळे संबंधित व्यक्तीचे शारीरीक तापमान, त्याची आरोग्य हिस्ट्री, करोनाच्या संसर्गाची लक्षणे काही क्षणात दाखवण्याची यंत्रणा आहे. शाळा, कॉलेज, सरकारी कार्यालये, मार्केट, कॉम्प्लेक्स, मॉल्स, हॉस्पिटल्स, मंदिरे, हॉटेल्स, चित्रपटगृहे, खासगी कार्यालये येथे गन, स्कॅनर, मेटल डोअर या माध्यमातून कार्यान्वित होणारी ही यंत्रणा पूर्णपणे तंत्रज्ञानावर बेतलेली असून दोन ते तीन सेंकदात गर्दीत करोना बाधित, संशयित, प्राथमिक लक्षणे असलेली व्यक्ती अलार्मच्या माध्यमातून दाखवून देईल.

> **करोनाच्या विषाणूचे गांभीर्य भीषण आहे. यातून बचाव करण्यासाठी स्वत:ला सुरक्षित व आरोग्यदृष्ट्या सुदृढ ठेवण्याला पर्याय नाही. सामाजिक जीवनात वावरताना करोना संसर्गापासून वाचण्यासाठी अलर्ट करणारी ही यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी तयार आहे. सध्याच्या अत्यंत महत्त्वाच्या संकटाला दूर लोटण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून ही यंत्रणा बनवताना खूप आनंद झाला आहे.**
>
> – **अमर जाधव**, संचालक, ॲक्युरा टेक

# शिकवलेल्या अभ्यासक्रमावरच अंतिम वर्षाची परीक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे शासनाने जाहीर केले असून टाळेबंदी लागू होण्यापूर्वी शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावरच परीक्षा घेण्याची सूचना विद्यापीठांना करण्यात आली आहे.

करोनाचा प्रादुर्भाव आणि टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाच्या परीक्षा रद्द करून फक्त अंतिम वर्षाच्या किंवा सत्राच्या परीक्षा घेण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला. मात्र, अनेक विद्याशाखांचा अंतिम सत्राचा अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झालेला नाही. यंदा दुसरे सत्र सुरू झाल्यानंतर जेमतेम दोन ते अडीच महिन्याचा कालावधी अध्यापनासाठी मिळाला. मार्च महिन्याच्या मध्यात म्हणजे १७ मार्चपासून राज्यात टाळेबंदी लागू झाली. त्यानंतर महाविद्यालयांमधील अध्यापन थंडावले. आता अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी दुसऱ्या सत्रातील सर्व अभ्यासक्रम पूर्ण झालेला नाही. टाळेबंदीनंतर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी अनेक महाविद्यालयांनी ऑनलाइन तासिकांचेही प्रयोग केले. मात्र, त्यातही तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या. त्यामुळे नेमक्या परीक्षा कोणत्या अभ्यासक्रमावर आधारित आणि कशा होणार असा प्रश्न उपस्थित झाला. त्या अनुषंगाने १३ मार्चपर्यंत शिकवून होणे अपेक्षित असलेल्या अभ्यासक्रमावरच परीक्षा घेण्यात याव्यात, अशी सूचना शासनाने परीक्षांबाबत नेमलेल्या समितीने दिली आहे.

## पीएच.डीसाठी मुदतवाढ

पीएच.डी.चे प्रबंध किंवा एम.फिल.चे शोधनिबंध सादर न केलेल्या विद्यार्थ्यांनाही समितीने दिलासा दिला आहे. विद्यार्थ्यांची मुदत या कालावधीत किंवा येत्या काही महिन्यांत संपत असल्यास त्यांना सहा महिने मुदतवाढ देण्याची शिफारस करण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांचे प्रबंध तयार आहेत, ते जमा करून पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी देण्याचा पर्यायही समितीने दिला आहे.

# Quarantine & isolation capacity being increased

## App To Track People Coming From Outside

TIMES NEWS NETWORK



Rahul Gayakwad

More quarantine and isolation wards are being developed in the hostels of Shivaji University

**Kolhapur:** After its decision on compulsory quarantine/isolation of people coming from cities and districts that have been marked as red zones, the Kolhapur Municipal Corporation has stepped up efforts to develop more quarantine and isolation centres.

Currently, the KMC has the capacity to accommodate around 1,000 people in its quarantine facilities. More quarantine and isolation wards are being developed in the hostels of Shivaji University. Similarly, beds are being set up in the marriage halls and school buildings.

Civic chief Mallinath Kalshetti said, "We are going to increase the number of beds. On Sunday, I discussed the matter with the hoteliers' association. Three hotel owners have agreed to accommodate the persons arriving from the hotspots such as Mumbai and Pune. People will have to bear the costs. They will be taken to the three covid care centres where their swabs will be taken and sent for testing. If they are positive, they will be put in isolation. If they test negative, they will be told to quarantine at home. Even those who are asymptomatic will be allowed to stay at homes."

The persons arriving in the city will be screened at the entry points. More thermal guns to check the body temperature have been made available. Currently, only those having passes for emergency travel are allowed in. The civic chief said volunteers are being taken on board to ensure that the persons advised home quarantine do not leave their homes.

"We are also developing an app with the help of software firms. This app will help us learn about those jumping quarantine. The volunteers will keep track of the movements of those coming from outside. Currently, we have 250 volunteers who will coordinate with our four officers," he said adding the app will be ready by Monday.

The district administration has, meanwhile, decided to get a written undertaking or affidavit from persons coming from outside. The undertaking would state that the person is willing to strictly follow home quarantine rules for 14 days and if they do not, they will be put into institutional quarantine. The decision to put people working as drivers in the red zones in institutional quarantine facilities has also been taken by collector Daulat Desai.

### Train to MP today

The 24-coach Shramik special train, with around 1,200 migrant workers, will leave from the Chhatrapati Shahu Maharaj Terminus on Monday at 5pm. The train has been arranged after the Madhya Pradhesh government gave consent for transport of migrants stranded in Kolhapur district. The migrants identified have been asked to arrive at the railway station by 1pm. TNN

# शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागात ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठमधील राज्यशास्त्र अधिविभाग व नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय चर्चासत्र ऑनलाईन पद्धतीने (वेबीनार) झाले. चर्चासत्रामध्ये महाराष्ट्रातील नवसामाजिक चळवळी (१९८०-२०२०) हा विषय होता. कार्यक्रमाचे उद्‌घाटक व बीजभाषक किशोर बेडकिहाळ (सातारा) होते. यावेळी डॉ. भारती पाटील, प्राचार्य पी. डी. देवरे (नाशिक), प्रा. बाबासाहेब फलके, डॉ. प्रकाश पवार यांनी मार्गदर्शन केले.शेवटच्या सत्रात पेपर वाचन झाले. यात ऑनलाईन पद्धतीने ९७ सदस्य सहभागी झाले. शोधनिबंध सत्रात भारतातील नवसामाजिक चळवळ, कोरोना संकट, नेहरूवादी नवसामाजिक चळवळी, सहकार चळवळ व शैक्षणिक चळवळी या विषयांतर्गत ५२ सदस्यांनी संशोधन पेपरच्या सारांशाचे वाचन केले. चर्चासत्रात डॉ. शिवाजी पाटील, प्रा. नेहा वाडेकर, डॉ. विजय देठे, डॉ. अनिल पाटील, डॉ. सागरकुमार जाधव यांनी सहभाग घेतला. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले. के. के. कावळेकर यांनी नियोजन केले.

पुढारी

# परीक्षा फी अन् बॅकलॉगचे काय?

## विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम; अद्याप भूमिका स्पष्ट नाही

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

राज्य सरकारने विद्यापीठाच्या प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा रद्द केल्या आहेत; पण ज्या विद्यार्थ्यांचे विषय बॅकलॉग राहिले आहेत, परीक्षा फी भरली आहे त्यांचे काय होणार, याबाबत भूमिका स्पष्ट नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

शिवाजी विद्यापीठाने उन्हाळी सत्राच्या परीक्षा घेण्याबाबत नियोजन केले होते. परंतु, वारंवार लॉकडाऊन वाढविल्याने परीक्षा वेळापत्रक रद्द झाले.



राज्य सरकारने नुकतेच विद्यापीठ परीक्षांबाबत नियोजन जाहीर केले. जुलै महिन्यात अंतिम वर्षातील अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. त्यापूर्वी सर्व अंतिम वर्गातील पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे काही अनुशेष शिल्लक असल्यास अशा परीक्षांचे नियोजन करावे. महाविद्यालयाने विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली प्रश्नपत्रिका तयार कराव्या, असे राज्यस्तरीय समितीच्या अहवालात म्हटले आहे. परंतु, लेखी की प्रात्यक्षिक परीक्षा याबाबत स्पष्टता नाही.

विद्यापीठाने परीक्षा घेण्याबाबत नियोजन सुरू केले आहे. परीक्षेसंदर्भातील विद्यार्थ्यांच्या अडचणी, समस्या याबाबतचे प्रश्न काढून ठेवण्यास सुरुवात केली आहे. विद्यापीठ नियुक्त १९ सदस्यीय समितीला यूजीसीच्या मार्गदर्शक सूचना आणि विद्यार्थ्यांच्या शंका, समस्यांचा अभ्यास करण्याचे निर्देश दिले आहेत. पुढील आठवड्यात समितीची बैठक होणार असून या सर्व गोष्टी त्यांच्यापुढे ठेवल्या जाणार आहेत.

“

पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबत सरकारने घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. परंतु, काही निर्णयामुळे विद्यार्थ्यांना अडचणी येणार आहेत. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या मागील बॅकलॉगसंबंधी विचार न झाल्यास त्यांचे वर्ष वाया जाण्याची शक्यता आहे. ऑनलाईन सबमिशन व तोंडी परीक्षांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध न होणाऱ्या सुविधांमुळे त्याचा गुणांवर परिणाम होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे.

**– प्रशांत आंबी,** राज्यसचिव, ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन

---

अंतिम सत्राची परीक्षा होणार आहे, परंतु, एटीकेटी असलेल्यांची परीक्षा जुलैमध्ये होणार का? जर होणार नसेल तर त्या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार आहे. त्यांना दुसरीकडे प्रवेश घेता येणार नाही. परीक्षा शुल्क भरले आहे, ते विद्यार्थ्यांना परत मिळणार का? याबाबत शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने तत्काळ खुलासा करुन गोंधळ दूर करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांमधून होत आहे.

# विद्यापीठात ऑनलाईन चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभाग आणि नेहरू अभ्यास केंद्रातर्फे आज ऑनलाईन (वेबिनार) राष्ट्रीय चर्चासत्र झाले. राज्यशास्त्र परिषदेच्या २६ व्या [illegible]ल्या अधिवेशनाचा 'महाराष्ट्रातील [illegible]सामाजिक चळवळी' विषय होता. [illegible] विभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र भणगे [illegible] प्रास्ताविक केले. बीजभाषक [illegible]ार बेडकिहाळ यांच्या हस्ते उद्घाटन झाले. अधिष्ठाता प्रा. डॉ. भारती पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. श्री. बेडकिहाळ यांनी सामाजिक चळवळ व आजचे कोरोना संकट यावर विवेचन करून सामाजिक चळवळी मजबूत केल्या पाहिजेत, तरच सामाजिक प्रश्न सोडवणे सुलभ जाईल, असे भाष्य केले.

चर्चासत्रात के. के. कावळेकर व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. प्रमुख वक्ते प्राचार्य पी. डी. देवरे (नाशिक) यांनी सामाजिक चळवळ व राज्य आणि आताची परिस्थिती या विषयावर विवेचन केले. संमेलनाध्यक्ष प्रा. बाबासाहेब फलके यांनी मनोगत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी विवेचन केले. शोधनिबंध सत्रात भारतातील नवसामाजिक चळवळ, कोरोना संकट, नेहरूवादी नवसामाजिक चळवळी, सहकार चळवळ व शैक्षणिक चळवळी याअंतर्गत ५२ सदस्यांनी संशोधन सारांशाचे वाचन केले. डॉ. शिवाजी पाटील, प्रा. नेहा वाडेकर, प्रा. डॉ. विजय देठे, डॉ. अनिल पाटील, डॉ. सागरकुमार जाधव यांनी नियोजन केले.

# अंतर्गत परीक्षा, सत्रावर गुणनिश्चिती

## शिवाजी विद्यापीठ; महाविद्यालय सुरु झाल्यावर एटीकेटी विद्यार्थ्यांची परीक्षा

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १० : कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठीय परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. त्यानंतर पदवीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय झाला; मात्र या दोन्ही वर्षातील विद्यार्थ्यांचे त्यांच्या अंतर्गत परीक्षा आणि प्रथम सत्रातील गुणांवरूनच अंतिम निकालपत्रक बनविण्यात येणार आहे. अंतर्गत परीक्षेतील ५० टक्के गुण, तर प्रथम सत्रातील ५० टक्के गुण ग्राह्य धरले जातील.**



> **पदवीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षातील विद्यापीठीय परीक्षा जरी रद्द झाली असली, तरी अंतिम गुणपत्रक बनविले जाईल. यात अंतर्गत परीक्षा, प्रथम सत्राची परीक्षा यांचे गुण ग्राह्य धरले जातील. याबाबतचा निर्णय घेऊन लवकरच अंतिम गुणपत्रकाबाबत महाविद्यालयांना सूचना दिल्या जातील.**
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

लॉकडाउनमुळे राज्यातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती. त्यामुळे विद्यापीठीय परीक्षा पुढे गेल्या. या परीक्षा कशा पद्धतीने घ्याव्यात, यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार राज्यातील कुलगुरूंच्या समितीने परीक्षांचे नियोजन केले.

यात पदवीच्या पहिल्या, दुसऱ्या वर्षांची परीक्षा रद्द करण्यात आली; तर तिसऱ्या वर्षाची परीक्षा घेण्याचा निर्णय झाला आहे. ही परीक्षा जुलैमध्ये होणार आहे. असे असले तरी पहिल्या आणि दुसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांना त्या वर्षाचे अंतिम गुणपत्रक द्यावेच लागेल. त्यामुळे हे मूल्यांकन कसे होणार, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे.

महाविद्यालयांनी वर्षभरात घेण्यात आलेल्या अंतर्गत परीक्षेचे ५० टक्के गुण आणि प्रथम सत्रातील परीक्षेचे ५० टक्के गुण ग्राह्य धरून अंतिम गुणपत्रिकेतील गुण दिले जातील.

**एटीकेटीची परीक्षा होणारच**

पहिल्या आणि दुसऱ्या वर्षात ज्यांना एटीकेटी मिळाली आहे, त्यांना अनुत्तीर्ण झालेल्या विषयाची परीक्षा द्यावीच लागणार आहे. या परीक्षा महाविद्यालय सुरू झाल्यावर घेतल्या जातील.

पुढारी

# विद्यापीठात उद्या ऑनलाईन कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवार (दि.१२) पासून 'औद्योगिक सुरक्षा' या विषयावर दोनदिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. पर्यावरणशास्त्र अधिविभाग व युनिव्हर्सिटी इंडस्ट्री इंटरॅक्शन सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) 'स्ट्राईड' योजनेअंतर्गत कार्यशाळा होणार आहे. पर्यावरणतज्ज्ञ पंकज कदम, सुरक्षा व्यावसायिक वाय. एस. मुळे, अमेय काळे, सागर अहिवाळे औद्योगिक सुरक्षाविषयक मुद्यांवर ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेस उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. पी. डी. राऊत यांनी केले आहे.

My Kolhapur Edition
11 May, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# विद्यापीठात आजपासून मानवी मूल्यांविषयक मोफत ऑनलाईन कोर्स

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सोमवार (दि.११) पासून 'मानवी मूल्ये' या विषयावर तीस दिवसीय ऑनलाईन कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागामार्फत १० जूनपर्यंत सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत कोर्स चालणार आहे. स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे सहायक प्रा. डॉ. पी. जे. पाटील व विषयतज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.